26 NOV 2023
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आंतरविभागीय कुस्ती स्पर्धेत मंडलिक महाविद्यालयास जेतेपद

वार्ताहर
मुरगूड

आंतर विभागीय कुस्ती स्पर्धेत येथील सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाच्या विद्यार्थिनीनी सलग दुसऱ्या वर्षी विजेतेपद कायम राखले. त्यांचा महाविद्यालयाच्या वतीने नुकताच सत्कार करण्यात आला. शिवाजी विद्यापीठांतर्गत, आंतर विभागीय महिला कुस्ती स्पर्धा आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज, कडेपूर. जि. सांगली येथे संपन्न झाल्या. या स्पर्धेत कोल्हापूर, सांगली, सातारा या तीन जिल्ह्यातील महिला कुस्तीगीरांनी सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेत मंडलिक महाविद्यालयाच्या महिला कुस्तीपटूंनी १८ गुण संपादन करून सलग दुसऱ्या वर्षीही विजेतपद



मुरगूड : विजेतेपदाच्या ट्रॉफीसह सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयांच्या मल्लांच्या समवेत, प्राचार्य डॉ. अर्जुन कुंभार, अण्णासो थोरवत, प्रा. डॉ. शिवाजी पोवार, दादा लवटे व इतर.

पटकाविले. या यशाचे मानकरी नेहा चौगुले (५३ किलो खाली) प्रथम क्र. अस्मिता पाटील (६२ किलो खाली) प्रथम क्र., अमृता पुजारी (७२ किलो खाली) प्रथम क्र., वैष्णवी कुशप्पा (७६ किलो खाली) द्वितीय क्र.

दरम्यान, मंडलिक महाविद्यालयातील नेहा चौगुले, अस्मिता पाटील, अमृता पुजारी व विजय डोईफोडे या चार मल्लांची चंदिगड येथे होणाऱ्या पश्चिम विभागीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे. सर्व विजेत्या मल्लांना संघ व्यवस्थापक प्रा. डॉ. शिवाजी पोवार, दादा लवटे यांचे मार्गदर्शन लाभले. तर प्रा. खा. संजय मंडलिक, कार्याध्यक्ष ॲड वीरेंद्र मंडलिक, कार्यवाह अण्णासो थोरवत, प्राचार्य डॉ. अर्जुन कुंभार यांचे प्रोत्साहन लाभले.

26 NOV 2023
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कुस्ती स्पर्धेत मंडलिक महाविद्यालयास विजेतेपद

**मुरगूड : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठांतर्गत आंतरविभागीय महिला कुस्ती स्पर्धेत येथील सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाच्या महिला कुस्तीपटूंनी १८ गुणांची कमाई करत सलग दुसऱ्या वर्षी विजेतेपद पटकावले.

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयातील नेहा चौगले, अस्मिता पाटील व अमृता पुजारी या मल्लांची चंदिगड (पंजाब) येथे होणाऱ्या पश्चिम विभागीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

कडेपूर (जि. सांगली) येथील आर्टस् अँड कॉमर्स कॉलेजमध्ये शिवाजी विद्यापीठ अंतर्गत, आंतरविभागीय महिला कुस्ती स्पर्धा झाल्या. या स्पर्धेत कोल्हापूर, सांगली, सातारा या तीन जिल्ह्यांतील महिला कुस्तीगीर सहभागी झाले होते. स्पर्धेत विजेते कुस्तीगीर असे : नेहा चौगले (५३ कि.), अस्मिता पाटील (६२ कि.), अमृता पुजारी (७२ कि.) प्रथम, वैष्णवी कुशप्पा (७६ कि.) द्वितीय. या मल्लांना संघ व्यवस्थापक प्रा. डॉ. शिवाजी पोवार, दादासो लवटे यांचे मार्गदर्शन लाभले, तर प्रा. खा. संजय मंडलिक, कार्याध्यक्ष अॅड. वीरेंद्र मंडलिक, कार्यवाह अण्णासो थोरवत, प्राचार्य डॉ. अर्जुन कुंभार यांचे प्रोत्साहन लाभले.



कडेपूर : प्रमुख अतिथींच्या हस्ते विजेतेपदाची ट्रॉफी स्वीकारताना कुस्तीपटू. सोबत, प्रा. डॉ. शिवाजी पोवार, दादासो लवटे आदी.